आपल्यावर झालेल्या टीकेला घाबरू नका, कारण टीकेला जो टिकतो तोच खरा ह्या जगात टिकतो.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार ३० जानेवारी २०२५ | अंक५२ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# तेव्हाही मौनी अमावस्या ठरली होती काळरात्र

## चेंगराचेंगरीत ८०० जणांचा मृत्यू, कुंभमेळा अन् चेंगराचेंगरीचा असा इतिहास

प्रयोगराज : कुंभमेळा या पृथ्वीवरील सर्वात मोठा धार्मिक सोहळा आहे. ४० कोटी लोक या महामेळाव्यात यंदा शाही स्नान करतील अशी आकडेवारी जारी झाली होती. अमेरिकेची लोकसंख्या ३४ कोटी इतकी आहे. यावरुन तुम्हाला अंदाज येऊ शकते की महाकुंभ मेळाव्याला सर्वात पवित्र स्नानाचा दिवस असलेल्या मौनी अमावस्येला किती लोक जमले असतील. या मंगळवारी रात्री संगम घाटाकडे निघालेला जथ्था सर्व बॅरिकेट्स तोडून अनेकांना तुटवडत पुढे गेल्याने अनेकांचे मृत्यू झाले आहे. गर्दीच्या मानसशास्रानुसार जो तो आपला स्वतःचा जीव वाचवायला जातो. या दुर्घटनेत पाठून एवढा प्रेशर होता कि पुढे जाणेच त्यांच्या हातात होते आणि मग व्हायचे तेच झाले या अपघातात १४ लोक ठार झाल्याची आकडेवारी दिली जात आहे. तर ५० हून अधिकजण जखमी झाले आहेत. या चेंगराचेंगरीनंतर सर्व १३ आखाड्यांनी मौनी अमावस्येचे अमृत स्नान अखेर रद्द केले आहे.महाकुंभमध्ये आज बुधवारी मौनी अमावस्येचे महाशाही स्नान होते. या कारणाने येथे जवळपास ५ कोटी श्रद्धाळू जमले होते. अमृतस्नानामुळे सर्व तरंगते पूल बंद केले होते, त्यामुळे ज्याला त्याला गंगेत डुबकी मारायची होती.त्यामुळे गर्दी नियंत्रणाबाहेर गेली. बॅरिकेट्समध्ये अडकून काही लोक पडले. आणि अफवा पसरून गर्दी सगळ्यांना तुडवत पुढे गेली आणि अपघात घडला मौनी अमावस्या : प्रयागराजमध्ये अमृतस्नानाच्या दिवशीच ८०० जण मृत्यूमुखी पावले होते तारीख होती ३ फेब्रुवारी १९५४. स्थळ प्रयागराज ( तेव्हा अलाहाबाद ) मौनी अमावस्याच्या पवित्र स्नानासाठी लाखो श्रद्धाळू अमृत स्नान करण्यासाठी पोहचले होते. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या कुंभ मेळ्यात तेव्हा चेंगराचेंगरीला एक घटना कारणीभूत ठरली होती. एक हत्ती नियंत्रणाबाहेर गेल्याने जीव वाचविण्यासाठी इकडे तिकडे पळू लागले. परिस्थिती एवढी बिघडली की चेंगराचेंगरी झाली सर्वत्र अफरातफर माजली. लोक किंचाळत होते. सगळीकडे आक्रोशपसरला होता. या घटनेत ८०० लोकांचा प्राण गेल्याने हत्तींवर नंतर बंदी घालण्यात आली. कुंभ मेळ्यात हत्तींचा प्रवेशावर निर्बंध लादले ते कायमेचे झाले. अनेक मीडियातील बातम्यांनुसार तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांच्या







आगमनाने गर्दी वाढविल्याचे म्हटले जाते. त्यांच्यासाठी केलेल्या संरक्षक उपाययोजनांमुळे कुंभच्या सुरक्षेवर परिणाम झाल्याचे म्हटले जात आहे. बीबीसीच्या बातमीनुसार मात्र पंडित जवाहर लाल नेहरुंनी कुंभ मेळ्याच्या आयोजनाची स्थितीची पाहणी एक दिवसआधीच केलेली होती. त्यामुळे घटनेच्यावेळी ते तेथे उपस्थित नव्हते असे बीबीसीच्या बातम्यात म्हटले आहे. या दुर्घटनेनंतर सरकारने धडा घेतला आणि धार्मिक समारंभासाठी आपली रणनिती बदलली. कुंभ मेळ्यात प्रत्येक क्षणाची माहिती देण्यासाठी लाऊडस्पीकर लावण्याची सुरुवात केली. लाईटच्या व्यवस्थेवर देखील खास लक्ष ठेवण्यात आले. १९५४ च्या दुर्घटनेनंतर पंडित नेहरु यांनी गर्दी टाळण्यासाठी कुंभ मेळा सारख्या प्रमुख स्थळांवर व्हिआयपींच्या दौऱ्यांवर बंदीच घातली. उत्तर प्रदेश सरकारने या नंतर अनेक पावले उचलली आहे. संगम तटावर अस्थायी हॉस्पिटलची उभारणी केली. हरवलेल्या व्यक्तींसाठी बूथ उघडले. अनेक उपाययोजना केल्या. कुंभमध्ये चेंगराचेंगरीचा इतिहास १९८६ : हरिद्वार कुंभमध्ये २०० लोकांचे प्राण गेले साल १९८६ मध्ये हरिद्वारमध्ये आयोजित कुंभ मेळ्यात त्यावेळी चेंगराचेंगरी झाली जेव्हा उत्तर प्रदेशचे तात्कालिन मुख्यमंत्री वीर बहादूर सिंह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि खासदारांसह हरिद्वारल पोहचले. त्यावेळी सर्वसामान्यांना सुरक्षारक्षकांनी रोखले. तेव्हा गर्दी बेकाबू झाली. त्यावेळी २०० जणांचे प्राण गेले होते. २०१३ : प्रयागराजमध्ये पादचारी कोसळ्याने ४२ जणांचा मृत्यू साल २०१३ मध्ये उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित कुंभमेळाव्यात चेंगराचेंगरी झाली होती. १० फेब्रुवारी २०२३ रोजी अलाहाबाद येथील रेल्वे स्थानकावर पादचारी पुल कोसळूल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. यात ४२ जणांचा

## अरेबियन ज्वेलर्सच्या ड्रॉमध्ये चार भाग्यवान विजेत्यांना बुलेट बाईक



**बीड शहरातील प्रसिद्ध अरेबियन ज्वेलर्स यांनी दिनांक २८ जानेवारी रोजी चौथ्या ड्रॉचे आयोजन केले होते. या भव्य सोहळ्यात चार भाग्यवान विजेत्यांना बुलेट बाईक प्रदान करण्यात आली. हा शानदार कार्यक्रम हॉटेल गोल्डन चॉईस येथे संध्याकाळी ८ वाजता हजारो नागरिकांच्या उपस्थितीत पार पडला.ड्रॉसाठी मान्यवर ॲड. सनाउल्ला इनामदार, इमरान जागीरदार, पाले खान आणि आनंद वीर यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्यांची चिट्ठी काढण्यात आली. कार्यक्रमादरम्यान नागरिकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. विजेत्यांची नावे १. काशिफ अतिखर शेख,मोमिन इम्रान अब्दुल रौफ,शेख खानसा अजीम, अन्सारी जब्बार जफर आसे भाग्यवान विजेत्यांना तत्काळ बुलेट बाईक सुपूर्द करण्यात आल्या, ज्यामुळे उपस्थितांनी अरेबियन ज्वेलर्सवर प्रचंड विश्वास व्यक्त केल**

## चौसाळा येथे मराठा आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी रास्तारोको आंदोलन संपन्न

चौसाळा :- ( दि.२९ ) महाराष्ट्र ातील मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देवून ओबीसी मधून आरक्षण देण्यात यावे व ईतर मागण्यासाठी मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटी येथे (ता.२५) पासून आमरण उपोषणाला बसलेले आहेत. त्यांची प्रकृती खालावत चालल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये चिंता पसरली असुन म हाराष्ट्र सरकारने त्यांच्या खालवलेल्या प्रकृतीची गांभीर्याने दखल घेऊन सर्व मागण्या मान्य कराव्या यासाठी बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा येथे आज (ता.२९) बुधवार रोजी सोलापूर - धुळे राष्ट्रीय महाम ार्गावर दुपारी १२ वाजता चौसाळा बसस्थानक येथे रस्ता रोको आंदोलन सामाजिक कार्यकर्ते



सतिष जोगदंड, बाळासाहेब मोरे, डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतिष जोगदंड, बाळासाहेब मोरे, डॉ. गणेश ढवळे यांची समायोचित आंदोलन स्थळी भाषणे झाली. त्यानंतर मंडळ अधिकारी श्री जायभाये, तलाठी श्री निर्मळ ,पोलिस प्रशासनाचे पीएसआय बनसोडे ,पो.ह.डोंगरे, बळवंत,खटाणे, मुरूमकर,घुले, ढाकणे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तसेच पोलीस प्रशासनाने ही कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. यावेळी सुधाकर गुंजाळ, प्रा. आबासाहेब जाधव, महंमद शरीफ, रेवण येडे, बाळासाहेब जोगदंड, श्रीमंत सोनवणे, खलील मुजावर, पांडुरंग आंधळे, सुभाष चव्हाण, पंजाब वाघमारे, रविंद्र जोगदंड, विकास शिंदे, शहादेव जोगदंड, राजेंद्र वाघ, बिभीषण जोगदंड, अमोल कांबळे, कोंडीराम जोगदंड, फ ुलचंद येडे, आदिनाथ नाईकवाडे, श्रीराम काशीद, उमेश नाईकवाडे, अनिल टाके, शकील सय्यद, सुनील नाईकवाडे, पंजाब नाईकवाडे, संजय भिल्लारे, श्रीमंत नाईकवाडे, रितेश शिंदे, भागवत गोलेकर, खदीर पठाण, कुणाल जाधव, बाबुराव गायकवाड, बाळासाहेब राऊत, जालिंदर हावळे, संतोष जोगदंड, आरुण झोडगे, शेरा नाईकवाडे, दिपक जोगदंड, विठ्ठल बोरखेडे, बब्रुवाहन जगताप, भास्कर कवाडे, यांच्यासह चौसाळा सर्कल मधील सकल मराठा बांधवा बरोबर सर्व जाती धर्माच्या नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे-विजय साळवे

माजलगाव । प्रतिनिधी परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या संविधान प्रेमी शहिदाच्या मारेकऱ्यास फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी रिपाई नेते विजय दादा साळवे यांनी परभणी ते मुंबई येथे निघालेल्या लाँगमार्च मध्ये आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधताना प्रतिक्रिया दिली. त्यांच्यासोबत कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते लाँग मार्चमध्ये ज्येष्ठ नेते कचरू तात्या खळगे, डॉ. खळगे,अंकुशराव जाधव,पत्रकार किशन भदर्गे, दीपकराव टाकणखार,दिलीपराव मक्सरे, राजकुमार सोनवणे, डी एस साळवे , वडवणीचे उजगरे,प्रकाश खळगे सर इत्यादी सहभागी झाले आहेत याबाबत अधिक माहिती अशी की सोमनाथ सूर्यवंशी हे कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी होते व ते ङ.ङ.इ. च्या परीक्षेची तयारी करीत होते अशा या कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याने कोणतीही दगडफेकी केली नव्हती किंवा कोणत्याही सीसीटीव्ही किंवा व्हिडिओ कॅमेरात ते दिसून आलेले नसतांनाही संविधानाच्या प्रतिमेची मोडतोड करून परभणीत दंगल कडून आणण्याचा प्रयत्न काही जातीवाद्यांनी केला होता व या परभणी शहरांमध्ये जे संविधानाच्या प्रतीकृतीची मोडतोड केली म्हणून परभणी जिल्हा बंद पुकारलेल्या संविधान प्रेमी नागरिकांनी कोणतेही असंवैधानिक काम केले नव्हते परंतु मोडतोड करून भारत देशाशी गद्दारी करणाऱ्यानी संविधानाची मोड तोड करून ज्या लोकांनी परभणी शहरांमध्ये व पर्यायाने महाराष्ट्रभर दंगली घडवून आणण्याचा कट काही जातीवाद्यांनी रचला होता व त्याचाच भाग म्हणून परभणी शहरांमध्ये लोकशाही मार्गाने परभणी जिल्हा बंद चे आव्हान करणाऱ्या आंबेडकर प्रेमी तरुणांवर कोणतेही असंवैधानिक काम न करता परभणी बंदचे आवाहन करीत होते परंतु भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करण्यापूर्वी एक दिवस अगोदर एक मोर्चा परभणी शहरात निघाला होता व त्या मोर्चामध्ये संविधान विरोधी घोषणा सुद्धा देण्यात आल्या होत्या आणि दुसऱ्याच दिवशी संविधानाची प्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्या च्या हातात होती त्या संविधानाच्या पुस्तकाची मोडतोड करण्याचे काम एका माथेफिरूनी केले आणि त्या संविधानाची मोडतोड झाली म्हणून लोकशाही मार्गाने व शांततेने परभणी जिल्हा बंद चे आव्हान करणाऱ्या आंबेडकर प्रेमी तरुणांना सोडून काही जातीवादी गुंड पोलिसांची वर्दी घालून व काही गुंड प्रवृत्तीचे लोक मोडतोड दगडफेक करीत असल्याचे षडयंत्र रचून पळून गेले व जे लोकशाही मार्गाने आंबेडकर प्रेमी तरुण परभणी जिल्हा बंदचे आवाहन करीत होते त्यांना कोंबिंग ऑपरेशन करून व आंबेडकरी वस्त्यांमध्ये घुसून काही पोलिसांनी आंबेडकरी तरुणांचे कोंबिंग आपरेशन करून त्यांना बेदम मारहाण करत होते काही आंबेडकरी तरुणांना अशा ठिकाणी निरपराध बौद्ध तरुणांना गाठले की जिथून त्या तरुणांना पळून सुद्धा जाता येणार नाही जसे की जालियनवाला बाग हत्याकांड झाले होते त्याप्रमाणे त्या संविधान प्रेम आंबेडकरी तरुणांना गाठून बेदम मारहाण करीत होते

## विनायक प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

बीड । प्रतिनिधी शहरातील पेठ बीड विभागातील विनायक प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पालक मेळावा कार्यक्रमाचे उद्घाटन आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले सर यांच्या शुभ हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी,स्व.माजी खासदार केशरकाकूंच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. आदर्श शिक्षण संस्थेचे कार्यवाहक श्री.एम.ए.राऊत सर, प्राचार्य श्री.एम. सी.जाधव सर, माजी केंद्रप्रमुख श्री.फईम सर,दैनिक मिल्लतचे संपादक श्री.उमेर सलीम अख्तर, पत्रकार इम्रान शाह,नगरसेवक विकास जोगदंड, नगरसेवक इलियास शेख,भारतीताई क्षीरसागर मॅडम, उपमुख्याध्यापक श्री.बेग सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे प्रास्ताविकामधून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.किर्तीताई पांगारकर यांनी स्नेहसंमेलन कार्यक्रमाची रूपरेषा मांडली व शाळेच्या शैक्षणिक वर्षभर राबवलेल्या विविध उपक्रमाचा आढावा घेतला व पालकांशी संवाद साधला.विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर कौशल्यपूर्ण,कलागुण विकसीतपूर्ण शिक्षण मिळणे महत्वाचे, आहे, चटणी भाखर खा पण आपल्या मुलांना शिकवा, मुलांच्या शिक्षणासाठी शाळेला सहकार्य करा असे पालकांना अहवान करून अतिशय उत्साहापूर्ण विचारातुन श्री.फईम सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा म्हणून विनायक प्राथमिक शाळेला रोख सहा हजार रुपये सुपूर्द केले.शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, हा उद्देश समोर ठेवून आपण शिक्षण दिले तर नक्कीच शिक्षणाचे महत्त्व लक्षात येईल,विद्यार्थी शिक्षणामध्ये शिक्षक,विदयार्थी आणि पालक हे महत्वाचे घटक आहेत असे श्री.एम.ए.राऊत सरांनी स्नेहसम्मेलनाच्या प्रसंगी आपले विचार व्यक्त केले. शिक्षणाबरोबर अंगी असणारे गुण खुप महत्वाचे आहेत

# मी उपोषण करणार नाही, पण आता वेगळ्या मार्गाने.. मनोज जरांगे पटलांचा थेट इशारा

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांनी आक्रम क भूमिका घेत उपोषण सुरु केले होते. मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी २५ जानेवारी २०२५ पासून उपोषणाचे हत्यार उपसलं होतं. मनोज जरांगे हे सातव्यांदा उपोषणासाठी बसले होते. त्यांनी आंतरवाली सराटीत उपोषण सुरु केले होतं. गेल्या ५ दिवसांपासून मनोज जरांगे हे उपोषण करत आहेत. आता मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. आम्ही गेले पावणे दोन वर्षे आंदोलन केली. मात्र आता वेगळ्या मार्गाने मी आंदोलन करणार, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

मनोज जरांगे पाटील हे गेल्या ५ दिवसांपासून उपोषणासाठी बसले आहेत. सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या, ङ्गसगे सोयरेफ अंमलबजावणी तातडीने करा, शिंदे समितीला तातडीने मुदतवाढ द्या, कक्ष सुरू करा, वंशावळ समिती गठीत करा, शिंदे समिती मनुष्यबळ वाढवा, संख्याबळ द्या,नोंदी सापडलेल्या लोकांना प्रमाणपत्र द्या, अशा मागण्या त्यांनी सरकारपुढे ठेवल्या आहेत. आता मनोज जरांगे पाटील यांनी एक पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडण्याबद्दल मोठे विधान केले. उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत उपोषण सोडण्याबद्दल मराठा समाजाशी बोलून निर्णय घेणार आहे, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

मी आता उपोषण करणार नाही. पण आता झक पक आंदोलन करणार आहे. उद्या दुपारी १२ वाजता उपोषण सोडण्याबाबत मराठा समाजाशी बोलून निर्णय घेणार आहे. आज रात्री किंवा सकाळी मराठा समाजाशी बोलून उपोषण सोडणार अशी मोठी घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली.

मी संतोष देशमुखांचे प्रकरण मागे पडू देणार नाही आमचे डोळे उघडले आणि मराठा समाजाचे डोळे उघडले आहेत. खऱ्या आरक्षणाचा मारेकरी कोण हे सर्वांना माहित झालं आहे. देवेंद्र फडणवीस जाणून बुजून काम करत नाही, हे मराठा समाजाला कळलं आहे. संतोष देशमुखांचा प्रकरण आमच्यासाठी महत्त्वाचं आहे. धनंजय देशमुख यांना सकाळी मी बोललो आहे की मी संतोष देशमुखांचे प्रकरण मागे पडू देणार नाहीङ्घ, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

ङ्गफडणवीस साहेब आता लय दिवस आनंद राहणार नाही मी समाजाशी बोलून थोड्या वेळात उपोषणाची भूमिका कळवतो. आज रात्री किंवा सकाळी बोलतो. त्यानंतर माझी भूमिका कळवतो. एवढे दिवस आम्हाला उपोषण करायची वेळ येईल हे अपेक्षितच नव्हतं. फडणवीस गद्दारी मराठ्यांशी करणार असं आम्हाला वाटत नव्हतं. मी उपोषणाला बसलो आणि सिद्ध झालं की देवेंद्र फडणवीस मराठा समाजाच्या मागण्याकडे लक्ष देत नाही. मराठा समाजाच्या मागणीची अंमलबजावणी होईल असा आम्हाला वाटत होतं. परंतु लक्षात आलं की मराठ्यांना काही द्यायचं नाही. आम्ही सकाळी सांगितलं होतं फडणवीसांना आमच्या मागण्या म ान्य करायचे का नाही, हे बोललं पाहिजे होतं. परंतु ते काही बोलले नाही. त्याम ुळे सिद्ध झालं आहे की मराठा समाजाचा आरक्षणाचा मारेकरी कोण आहे, असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला. फडणवीस साहेब, आता आनंद लय दिवस राहणार नाही, आनंदावर विरजन पडेल. ज्या दिवशी बोलायचं त्या दिवशी तुम्हाला सांगे. खरी चूक



कोणाची आहे हे मराठा समाजाला कळालं आहे. आता आमच्या पद्धतीने आम्ही आंदोलन करू आणि आम्ही काय आता वेगळ्या पद्धतीने आंदोलन करू. बेईमानी आणि गद्दारी फडणवीस यांच्याकडून होईल असे वाटले नव्हते. जे हक्काचे आहे ते आरक्षण देत नाहीत. आम्हाला उपोषण करायचे नव्हते. आम्हाला वाटले, दोन दिवसात मागण्या पूर्ण होतील. फडणवीस यांनी मात्र चुप्पी मारली. मराठाविषयी किती द्वेष आणि आकस आहे दिसून आले. फडणवीस किती मराठा द्वेषी आहेत, ते उघडे पडले. आंदोलन सोडल्यानंतर सोडणार नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. आता झक पक आंदोलन करणार देवेंद्र फडणवीस गद्दारी करतील, असे स्वप्नात वाटले नव्हते. आज रात्री किंवा सकाळी मराठा समाजाशी बोलून उपोषण सोडणार आहे. देवेंद्र फडवणीस यांनी मराठ्यांचे मने जिंकायला पाहिजे होते. मी बोलायला सुरू करेल, तेव्हा तुम्हाला तिन्ही ताळात जागा राहणार नाही. मराठ्यांनी सावध व्हावे, मुला-बाळांचे वाटोळे होऊ देऊ नका. पावणे दोन वर्षे आंदोलन केली. आता वेगळ्या मार्गाने आंदोलन करणार आहे. मराठा समाज उपोषण करणार नाही, पण आता झक पक आंदोलन करणार आहे. उद्या दुपारी १२ वाजता उपोषण सोडण्याबाबत समाजाशी बोलून निर्णय घेणार आहेत असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार ३० जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### कौन बनेगा दिल्लीपती?

आपचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासाठी दिल्ली विधानसभा निवडणूक अस्तित्वाची लढाई बनली आहे. सध्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. ङ्गआपफ्सह सारेच राष्ट्रीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत. ङ्गआपफ आणि काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. आप, काँग्रेस आणि भाजप अशी तिरंगी लढत आहे. दिल्लीच्या ७० जागांसाठी एकाच टप्प्यामध्ये मतदान होणार आहे. मतदान ५ फेब्रुवारी रोजी होणार असून ८ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल. लोकसभा निवडणुकीत राजस्थानच्या फलोदी सट्टा बाजाराने काही अंदाज वर्तवले होते. आता त्यांनी दिल्ली विधानसभेसाठीही काही अंदाज वर्तवले आहेत. त्यांची भविष्यवाणी खरी ठरल्यास यंदा दिल्लीमध्ये चित्र संपूर्णपणे बदललेले दिसू शकेल. ङ्गफलोदीफ्च्या अंदाजानुसार दिल्लीतील आम आदमी पक्षाचे सरकार काहीसे अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसची मदत घ्यावी लागेल तर भाजप हा एक मजबूत विरोधी पक्ष म्हणून उदयास येऊ शकेल. थोडासा उलटफेर झाल्यास भाजपची सत्ताही येऊ शकेल. फलोदी सट्टा बाजार अचूक अंदाजासाठी प्रसिद्ध आहे. हे केवळ अंदाज असतात. ते खरे ठरतात की नाही हे निवडणुकीचा निकाल लागल्यावरच स्पष्ट होईल. ङ्गफलोदीफ्च्या अंदाजानुसार आम आदमी पक्षाला नुकसान होण्याची शक्यता आहे तर भाजप आपली पकड मजबूत करताना दिसेल. भाजपला २५-३० जागा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, ते बहुमताचा आकडा पार करण्याची शक्यता कमी आहे. अरविंद केजरीवाल यांनी १५ हमीपत्रांची घोषणा केली आहे. त्यात सलग तिस-यांदा यमुना साफसफाईचे आश्वासन देण्यात आले आहे. महिलांसाठी रोजगार, यमुनेची साफसफाई, २४ तास पाण्याची सोय, महिलांसाठी सन्मान योजना अशा घोषणा आहेत. दुसरीकडे अमित शहा यांनी केजरीवाल यांच्यावर टीकेचा भडिमार केला आहे. केजरीवाल हे केवळ आश्वासन देतात मात्र सत्यात काहीही उतरवत नाहीत. फक्त भाजप सरकारच आश्वासन पूर्ण करेल. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी भाजपचा तिसरा व अंतिम जाहीरनामा जारी केला. यात भाजपने तीन वर्षांत यमुना नदी प्रदूषणमुक्त करण्याचे, ५० हजार सरकारी पदे भरण्याचे, रोजगाराच्या २० लाख संधी निर्माण करण्याचे आश्वासन दिले. यावेळी अमित शहा यांनी केजरीवालांसारखा खोटारडा माणूस आपल्या आयुष्यात पाहिला नाही अशी टीका केली. केजरीवाल म्हणायचे की, आमचा एकही मंत्री सरकारी बंगला घेणार नाही. मात्र, केजरीवाल यांनी स्वत:साठी शिशमहाल बांधला आहे. रहिवासी वस्तीतील दारू दुकाने बंद करण्याचे आश्वासन दिले होते, पण त्यांनी मद्य वाटपात घोटाळा करून शाळा, मंदिर, गुरुद्वाराच्या बाजूलाही दारू दुकानांसाठी परवाने दिले. केजरीवाल दिल्लीकरांना आश्वासने देतात आणि नंतर केविलवाणा चेहरा करतात. केंद्रीय गृहमंत्र्यांनी केजरीवालांना यमुना नदीत स्नान करून दाखविण्याचे आव्हान दिले. तसेच आपले पाप धुण्यासाठी कुंभमेळ्यात जाऊन गंगेत स्नान करून यावे असा सल्लाही दिला. अमित शहा यांनी नुकतेच कुंभमेळ्यात जाऊन स्नान करत आपली पापे धुतली आहेत! दिल्ली विधानसभा निवडणुकीत प्रत्येक राजकीय पक्ष मतदारांना दररोज नवनवीन आश्वासने देत आहे. काँग्रेसने बौद्ध स्थळ पर्यटनाची मोफत यात्रा घडवून आणण्याचे आश्वासन दिले आहे. दिल्लीत हिंदू धर्मियांसाठी सरकारकडून मोफत यात्रा आयोजित केल्या जातात. दिल्ली सरकार तिरुपती, अयोध्या, वैष्णोदेवी या धार्मिक ठिकाणी भाविकांना मोफत धार्मिक पर्यटन घडवून आणत असते, पण बौद्ध धर्मियांसाठी अशी कोणतीही योजना नाही. काँग्रेस सरकार आले तर सारनाथ, बौद्धगया, लुम्बिनी, दीक्षाभूमी या बौद्ध स्थळांसाठी पर्यटन यात्रा घडविण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. केजरीवालांनी गुरुद्वारामधील पुजा-यांना दरमहा १८ हजार रुपये देण्याची घोषणा केली. परंतु बौद्ध भिक्खू, रविदास व वाल्मिकी मंदिरातील पुजा-यांना यातून वगळण्यात आले. केजरीवालांनी महिला सन्मान योजनेंतर्गत दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. एकंदरीत दिल्ली निवडणुकीसाठी सा-याच पक्षांनी रेवडी वाटप केले आहे. दिल्लीच्या नागरिकांपुढे दोन मॉडेल आहेत. पहिले आहे केजरीवाल मॉडेल. ज्यात जनतेवर पैसे खर्च केले जातात. दुसरे आहे भाजपचे मॉडेल. ज्यात जनतेचा पैसा त्यांच्या श्रीमंत मित्रांच्या खिशात जातो. आता कोणते मॉडेल निवडायचे ते जनतेने ठरवायचे आहे. ही निवडणूक केवळ दिल्लीला नाही तर देशाला वाचवण्याची निवडणूक आहे. ही भाजप आणि आम आदमी पक्षातील निवडणूक नाही तर दोन विचारसरणींमधील निवडणूक आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आश्वासनांच्या स्वरूपात पैशांचा पाऊस पाडत आहे. मोफत रोख रकमेचे राजकारण नियंत्रणाबाहेर गेले आहे.

# ३० जानेवारी : जागतिक कुष्ठरोग निवारण दिन

जागतिक कुष्ठरोग दिन दरवर्षी जानेवारी महिन्याच्या शेवटच्या रविवारी साजरा केला जातो . हा दिवस कुष्ठरोगाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो . भारतात हा दिवस ३० जानेवारीला साजरा केला जातो. जागतिक कुष्ठरोग दिन साजरा करण्यामागचे उद्देश : कुष्ठरोगाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे , कुष्ठरोगाविषयी समाजात पसरलेले गैरसमज दूर करणे , कुष्ठरोग संबंधित कलंक आणि भेदभाव संपविण्याचे आवाहन करणे हे आहेत. जागतिक कुष्ठरोग दिन साजरा करण्याची सुरुवात १९५४ मध्ये झाली होती . या दिवसाची स्थापना फ्रेंच मानवतावादी राउल फोलेरू यांनी केली होती. कुष्ठरोगाबद्दल अधिक माहिती : कुष्ठरोग हा एक संसर्गजन्य रोग आहे. कुष्ठरोगाला हॅन्सन रोग असेही म्हणतात. यास इंग्रजीत लेप्रसी असे म्हणतात . कुष्ठरोग हा जगातील सर्वात जुन्या नोंद झालेल्या रोगांपैकी एक आहे. हा आजार एक प्रकारच्या जिवाणूंमुळे होतो . कातडीबरोबरच हा आजार चेतातंतूंवरही दुष्परिणाम करतो. कातडीवर न खाजणारे चट्टे व बधिरता येते . नंतरनंतर तळव्यावर व्रण होणे, नाक बसणे, हातापायाची बोटे आखडणे किंवा वाकडी होणे, इत्यादी लक्षणे कुष्ठरोगात आढळतात. हा आजार आनुवंशिक नाही . हा आजार सांसर्गिक प्रकारच्या रुग्णांच्या संसर्गाने एकमेकांत पसरतो . यावर आता प्रभावी औषधे निघाल्याने बहुतेकांचा आजार सहा महिने ते दीड वर्ष या काळात पूर्ण बरा होतो . त्यासाठी कायमचे नुकसान होण्याआधीच या रोगाची सुरुवातीची लक्षणे ओळखून उपचार व्हायला पाहिजेत. कुष्ठरोग हा आजार मायको लेप्री नावाच्या जिवाणूंमुळे होतो . हे जंतू खूप सावकाश वाढतात . म्हणून हा आजारही खूप सावकाश वाढतो . ( २ ते ५ वर्ष लागू शकतात ) या आजाराचा प्रसार खूपच मर्यादित असतो . मुळात ९८% व्यक्तींना या आजाराविरुध्द उत्तम प्रतिकारशक्ती असते . म्हणजे फक्त २% जणांना हा आजार होऊ शकतो . त्यातही केवळ सांसर्गिक प्रकारच्या कुष्ठरोग-बाधित व्यक्तींकडूनच हे जंतू पसरू शकतात . उपचार सुरु केल्यावर महिन्याभरातच हे रुग्ण असांसर्गिक होतात.सांसर्गिक कुष्ठ रुग्णांच्या श्वसनावाटे हे जंतू पसरतात . श्वासोच्छ्वासातून जंतू तर पसरतातच , पण शिंकण्या खोकण्यातून विशेष संख्येने जंतू उडतात . क्षयरोगाप्रमाणेच कुष्ठरोग पसरतो त्वचेतून संपर्काने तो पसरत नाही . राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम : राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम भारत सरकारने सुरू केला . भारतातील १९५४ - ५५ मध्ये मल्टी ड्रग थेरपी ( एम डी टी ) १९८२ पासून मोठ्या प्रमाणावर वापरात आली आणि १९८३ मध्ये राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम सुरू करण्यात आला . हा लोकसंख्येतील संसर्गाचे प्रमाण कमी करून आणि संसर्गजन्य स्त्रोत कमी करून रोग नियंत्रित करण्यावर आधारित होता . अशा प्रकारे रोगाच्या प्रसाराची साखळी खंडित होते . हा कार्यक्रम सुरुवातीला स्थानिक जिल्ह्यांमध्ये घेण्यात आला आणि १९९३-९४ पासून जागतिक बँकेच्या सहाय्यकांसह देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये त्याचा विस्तार करण्यात आला . केंद्रीय कुष्ठरोग प्रशिक्षण आणि संशोधन संस्था संस्था चेंगलपट्टू , रायपूर , गौरीपूर आणि आस्का येथे तर प्रादेशिक कुष्ठरोग प्रशिक्षण आणि संशोधन संस्था स्थापन करण्यात आल्या . याव्यतिरिक्त आग्रा येथे एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले . देशात रोगाचा दर कमी करण्यात उल्लेखनीय प्रगती झाली आहे . डिसेंबर २००५ मध्ये राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय आरोग्य धोरणात सार्वजनिक आरोग्य समस्या म्हणून कुष्ठरोगाचे उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट भारताने साध्य केले , ज्याची व्याख्या प्रति १०,००० लोकसंख्येमागे १ पेक्षा कमी केस अशी आहे . दृष्टी : कुष्ठरोगमुक्त भारत हे व्हिजन आहे. ध्येय : कुष्ठरोगमुक्त भारत हे ध्येय म्हणजे एकात्मिक आरोग्य सेवा प्रणालीद्वारे , रोग बरा झाल्यानंतर अपंगत्वाची काळजी घेण्यासह , लोकसंख्येच्या सर्व घटकांना दर्जेदार कुष्ठरोग सेवा मोफत उपलब्ध करून देणे हे आहे . उद्दिष्टे : उपराष्ट्रीय आणि जिल्हा स्तरावर १ / १०,००० पेक्षा कमी लोकसंख्येचा प्रसार दर कमी करणे . राष्ट्रीय स्तरावरील नवीन प्रकरणांमध्ये अपंगत्व कमी करणे इत्यादी आहेत. धोरण : उपरोक्त उद्दिष्टे साध्य करण्यासाठी , मुख्य धोरणे खालीलप्रमाणे आहेत : १) सामान्य आरोग्य सेवा प्रणालीद्वारे एकात्मिक कुष्ठरोगविरोधी सेवा २) नवीन कुष्ठरुग्णांची लवकर तपासणी आणि पूर्ण उपचार ३) प्रकरणे लवकर शोधण्यासाठी घरगुती संपर्क सर्वेक्षण करणे ४) कुष्ठरोगाच्या प्रकरणांचा शोध आणि उपचार वेळेवर पूर्ण करण्यात मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्त्यांचा (आशा ) सहभाग ५) अपंगत्व प्रतिबंध आणि वैद्यकीय पुनर्वसन सेवांचे बळकटीकरण ६) आरोग्य आणि निरोगीपणा केंद्रे आणि ब्लॉक प्राथमिक आरोग्य केंद्र / सामुदायिक आरोग्य केंद्र येथे सखोल देखरेख आणि पर्यवेक्षण करणे इत्यादी आहेत.कुष्ठरोगाचे निदान आणि उपचार : - निदान आणि उपचारासाठी मोफत सेवा (मल्टी ड्रग थेरपी) प्राथमिक आरोग्य केंद्रे , सरकार यासारख्या सर्व सार्वजनिक आरोग्य सुविधांद्वारे प्रदान केल्या जातात . देशभरातील दवाखाने , सीएचसी , डीएच आणि वैद्यकीय महाविद्यालये येथे ही सुविधा मिळते . गुंतागुंतीची प्रकरणे, पुढील व्यवस्थापनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविली जातात . सर्व औषधे , निदान आणि सर्जिकल / नॉन-सर्जिकल कुष्ठरोगाच्या सर्व रूग्णांना विनामूल्य पुरविली जातात .क्षमता निर्माण - कुष्ठरोगाचे निदान आणि व्यवस्थापनासाठी पुरेशी कौशल्ये विकसित करण्यासाठी दरवर्षी वैद्यकीय अधिकारी , आरोग्य कर्मचारी , आरोग्य पर्यवेक्षक , प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि आशा या सामान्य आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेतले जाते. महाराष्ट्रात कुष्ठरोगाच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे . १ जानेवारी १९ ते ३१ डिसेंबर २३ या कालावधीत महाराष्ट्रात ८३२८१ कुष्ठरुग्णांची नोंद झाली आहे

# एमएमआर क्षेत्रातील जलसंपदा प्रकल्प तातडीने पूर्ण करावेत - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई: मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येला पुरेसा पाणी पुरवठा होण्यासाठी या क्षेत्रातील जलसंपदा प्रकल्प तातडीने पूर्ण करावेत. महसूल व वन विभागाने यासाठी आवश्यक त्या परवानग्या देण्याबरोबरच भूसंपादन प्रक्रिया निश्चित कालमर्यादा निर्धारित करुन तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील जलसंपदा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला उपमुख्यमंत्री तथा नगरविकास व गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे प्रकल्प) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, वनमंत्री गणेश नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह संबंधित विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव व सचिव उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुंबई महानगर क्षेत्रातील जलसंपदा प्रकल्प केवळ पिण्याच्या पाण्याचा स्रोत नसून, शाश्वत विकासासाठी महत्त्वाचा घटक आहेत. आगामी काळात जल व्यवस्थापनासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करून हे प्रकल्प कालबद्ध पद्धतीने वेळेत पूर्ण करावेत. या प्रकल्पासंदर्भात वन विभागाची मान्यता, एमएमआरडीए, सिडको आदी कार्यान्वयिन यंत्रणांनी परवाने व इतर अनुषंगिक बाबीसंदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण करून कामास गती द्यावी, असे निर्देश श्री. फडणवीस यांनी दिले. शाई व सुसरी प्रकल्पाची कामे सुरू करा मुंबई महानगर क्षेत्र हे सर्वांत वेगाने वाढणाऱ्या शहरी भागांपैकी एक असून, पाणीपुरवठा हा येथील महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे आगामी काळातील पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता शाई व सुसरी प्रकल्पाची कामे सुरू करण्याबाबत जलसंपदा विभाग आणि संबंधित यंत्रणेने कार्यवाही करावी, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या. एसटीपी प्रकल्पातील पाणी औद्योगिक वापरासाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुंबई महानगर क्षेत्रामध्ये ज्याठिकाणी सांडपाणी व्यवस्थापन प्रक्रिया (एसटीपी) प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू आहेत, तेथील पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) औद्योगिक वापरासाठी घ्यावे. या पाण्यावर आणखी काही प्रक्रिया करता येते, का याबाबतही अभ्यास करावा. एसटीपी प्रकल्पातील पाणी औद्योगिक वापरासाठी घेण्यासंदर्भात मुख्य सचिव यांनी एमआयडीसी आणि नगरविकास विभाग यांची एकत्रित बैठक घ्यावी. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाईपलाईन जुन्या झाल्या असल्याने पाण्याची गळती होते. पाण्याची ही गळती रोखण्यासाठी जुन्या पाईपलाईन बदलण्याबाबत कार्यवाही करावी. वाहून जाणारे पुराचे पाणी साठवण्याबाबतही नियोजन करावे, अशा सूचना देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या. काळू नदी प्रकल्पाचे काम जलदगतीने पूर्ण करावे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात पिण्यासाठी व औद्योगिक क्षेत्रासाठी काळू नदी प्रकल्प महत्त्वाचा असून हा प्रकल्प जलद गतीने पूर्ण करावा. ठाणे व परिसरातील नवीन वसलेल्या भागाला अतिरिक्त पाणी उपलब्ध करून द्यावे, असेही ते म्हणाले. बैठकीत देहरजी मध्यम प्रकल्प, काळू नदी प्रकल्प, भातसा (मुमरी) प्रकल्प, सूर्या (कवडास) उन्नैयी बंधारा, सूर्या नदीवरील पाच बंधारे, बाळगंगा नदी प्रकल्प, खोलसापाडा-२ लघु पाटबंधारे योजना, श्री हरिहरेश्वर पाणीपुरवठा योजना, जांभिवली (चिखलोली), शाई नदी प्रकल्प आणि सुसरी नदी प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला.

# कांदिवली येथील आर.जे.माखेचा हायस्कूलचा विविध कार्यक्रमासह प्रजासत्ताक दिन संपन्न

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम रविवार दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता कांदिवली पश्चिम येथील आर.जे.माखेचा हायस्कूलचा विविध कार्यक्रमासह प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात जल्लोषात साजरा करण्यात आला.पाहुण्याचे स्वागत वाद्य, कवायतीच्या माध्यमातून करण्यात आले, यावेळी प्रिन्सिपॉल अवनी बयानी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले सलामी देऊन राष्ट्रगीत सादर झाले. शाळेतील मुला मुलींनी साक्षी,प्रणव, अश्विन, प्रिती आदींनी प्रजासत्ताक दिनाची माहिती आपल्या भाषणातून सांगून तेथील वातावरण देशभक्तीमय केले.दहावीच्या मुला मुलींनी सुंदर सादरीकरण करून नयनरम्य असे नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.लहान मुला मुलींनी वेशभूषा मध्ये सहभाग घेऊन आपल्या मधील कलेची झलक दाखवली,या मध्ये झाशीची राणी, सुभाषचंद्र बोस,मी. गांधी, भगतसिंग, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.राजेंद्रप्रसाद, छत्रपती शिवाजी महाराज,अशा महान स्त्री व पुरुष यांच्या वेशभूषा धारण केल्या होत्या.मनपा आर दक्षिण विभाग यांनी भरवलेल्या विज्ञान प्रदर्शनात या शाळेने सहभाग घेऊन विशेष प्राविण्य मिळवले. शाळेतील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणा-या मुला मुलींना, शिक्षिका यांना पाहुण्यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.प्रजासत्ताक दिनानिमित्त सादर करण्यात आलेल्या कार्यक्रम




ासाठी प्रिन्सिपॉल अवनी बयानी,पीटी शिक्षक,नागरी संरक्षण दल प्रशासकीय अधिकारी सुधीर पवार, इव्हेंट इन्चार्ज कोमल आशर, निवेदिका वनिता केंडी, नृत्य दिग्दर्शिका कूपाळ पांचाळ,संगित शिक्षिका सोनाली सिंग, कर्मचारी अरविंद ठाकूर, यांच्या नियोजन बद्ध, शिस्त बध्द कार्यक्रमामुळे शाळेतील वातावरण देशभक्ती मय होऊन गेले होते.या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे साहित्यिक, गीतकार, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके, सायबर क्राईम सेल मुंबई पोलीस जयश्री तलवरे, ट्रस्ट चे अध्यक्ष सुरेश भाई पोपट, चेअरमन पियुषभाई धंधा, सेक्रेटरी मितेश भाई , ट्रस्टी विनोद भाई सिंघाल आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी प्रमुख पाहुणे भारत कवितके आणि जयश्री तलवरे यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी प्रिन्सिपॉल अवनी बयानी यांनी सर्वांचे आभार मानले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ३० जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# राज्यस्तरीय काव्यभूषण पुरस्काराने श्री दिनेश खैरे सन्मानित...

राज्यातील साहित्य क्षेत्रातील बहुआयामी बहुनामांकित , सर्वत्र चर्चिला जाणारा तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्था नाशिक यांच्यावतीने सर्व क्षेत्रातील निवडक राजकीय , सामाजिक , शैक्षणिक, क्रीडा कला ,सांस्कृतिक ,धार्मिक अध्यात्मिक ,आरोग्य तसेच कवी, लेखक ,संपादक ,शिक्षक, ग्रामसेवक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांमधून बोटावर मोजता येतील असे बहुविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

संभाजीनगर येथील तेजस फाउंडेशन या संस्थेच्यावतीने राज्यस्तरीय सम ाजभूषण पुरस्कार सोहळा डॉ.मौलाना आझाद संशोधन केंद्र टी व्ही सेंटर रोड, संभाजीनगर येथे नुकता संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती मा.श्री अशोक कपूर, सिने अभिनेता व दिग्दर्शक मुंबई, लोकशाहीर मा. श्री सुरेशभाऊ डोळस, ज्येष्ठ साहित्यिक ज्येष्ठ सिने अभिनेते पुणे, श्री राजू मोरे, अभिनेते व दिग्दर्शक मुंबई, श्री विनोद खंडारे सिने अभिनेते नागपूर, तेजस फाउंडेशनच्या अध्यक्षा मेघाताई डोळस , कवी लेखक श्री महेंद्र तुपे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

२०२५ चा सामाजिक साहित्य क्षेत्रातील राज्यस्तरीय काव्यभूषण पुरस्कार पुणे येथील नामांकित शिक्षण संस्था नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील कार्यरत असणारे कर्मचारी नवोदित कवी लेखक श्री दिनेश ताराचंद खैरे यांना नुकताच सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

श्री दिनेश खैरे हे मितभाषी, मृद स्वभावाचे, सेवा कार्यतत्पर, कवी लोकसाहित्य म्हणून सुपरिचित आहेत. सांस्कृतिक, अध्यात्मिक अशा सर्व क्षेत्रात त्यांचा वावर आहे. त्यांची दोन पुस्तके सुद्धा प्रकाशित आहेत. यापूर्वी त्यांना अनेक राज्यस्तरीय व आंतरराष्ट्र ीय स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांचे अनेक मानसन्मान सोहळे झाले आहेत.

# कै. सौ. रुक्मीन दत्तात्रय गुरव यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्य

## मोफत वंध्यत्व व टेस्टट्यूब बेबी शिबीराचे आयोजन



अंबाजोगाई/प्रतिनिधी:- डॉ. प्रल्हाद गुरव यांच्या मातोश्री. कै. सौ. रुक्मीनीबाई गुरव यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्य बीड जिल्ह्यातील पहिलेच अंबाजोगाई टेस्टट्यूब बेबी सेंटर व योगेश्वरी हास्पीटलच्या वतीने वंध्यत्व व टेस्टट्यूब बेबी शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन तरी लोकांनी जास्ती जास्त या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे. धावपळीच्या युगामध्ये वंध्यत्व याचे प्रमाण वाढत असलेले दिसुन येत आहे यामुळे डॉ. प्रल्हाद गुरव यांनी अंबाजोगाई टेस्टट्यूब बेबी सेंटर येथे दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता योगेश्वरी हास्पिटल अंबाजोगाई, तथागत चौक येथे शिबीराचे आयोजन केले आहे, जास्ती जास्त सहभागी होऊन आपली सर्व तपासणी मोफत मध्ये करुण घ्यावी तसेच या शिबिरात सोनोग्राफी आणी रक्त तपासणी केवळ पन्नास टक्के पैसे भरुण केली जाणार आहे. शहरातील व ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत तपासणी करुण घ्यावी असे आवाहन डॉ. प्रल्हाद गुरव यांनी केले आहे.

# साहित्य सारची कलामंच काव्य महोत्सव सोहळा संपन्न

प्रतिनिधी- जगदीप वनशिव

पुणे- येथील साहित्य सारथी कला मंच आयोजित काव्य महोत्सव करण्यात आला या काव्य महोत्सवात राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली गझल मुशायरा पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता प्रथम देवेंद्र गावंडे द्वितीय महादेव लांडगे तृतीय सौरभ आहेर उत्तेजनार्थ श्रीकांत जगताप महेमूदा शेख या विजेत्या कवीना सन्मानचिन्ह सन्म ानपत्र देऊन गौरविण्यात आले या काव्यवाचन स्पर्धेचे परिक्षक अभ्यासू विचारवंत साहित्यिक प्रा डॉ .सुरेश वाकचौरे यांनी केले सूत्रनिवेदिका प्रतिभा विभुते यांनी केलेअध्यक्ष सतिश देवपूरकर प्रमुख पाहुणे लोककवी सीताराम नरके प्रा रुपाली अवचरे जित्या जाली जितेन सोनवणे प्रा डॉ रुपचंद धनगर प्रा शैलेंद्र भणगे यांच्या उपस्थितीत काव्यवाचत स्पर्धा संपन्न झाली दुस□्या सत्रात पुरस्कार प्रदान करण्यात आले काव्यरत्न पुरस्कार डॉ गणेश पुंडे निरजन ठणठणकर साहित्यरत्न पुरस्कार कविता हांडवळे गझलरत्न पुरस्कार सागरराजे निंबाळकर समाजरत्न पुरस्कार दिलीप पवार निर्सगमित्र पुरस्कार तुकाराम गोविदवाड यांना मानपत्र स्मृतीचिन्ह पुष्प-गुच्छ देऊन मान्यवराच्या शुभ हस्ते सन्मानित करण्यात आले

गझल मुशायरा अध्यक्ष प्रा सतिश देवपूरकर गझलकार मसूद पटेल सुरेश धोत्रे बबन धुमाळ रुपाली अवचर सूत्रसंचालन दिनेश कांबळे व डॉ प्रशांत पाटोळे यांनी बहारदार दमदार आवजात सूत्रसंचलन केले पुणे विशेष उपस्थितीत निवेदक रानकवी जगदीप वनशिव चंद्रकांत जोगदंड प्रतिमा काळे बाळकृष्ण बाचल योगिता कोळेकर आनंद गायकवाड हे हजर होते येथील डॉ नानासाहेब परुळेकर विद्यालयातील ज्येष्ठ नागरिक संघ विश्रां-तवाडी यांच्या सभागृहा मध्ये साहित्य सारथी काव्य महोत्सव पुणे येथे संपन्न झाला

# मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे शासनाने दखल घ्यावी (धारूर तालुक्यातील सकल गरजवंत मराठा समाजाची मागणी)

किल्ले धारूर:-(ॲड.युवराज फुन्ने) मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण द्यावे म्हणुन मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण करत आहेत मा. म नोज दादा यांच्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ धारूर तालुक्यातील सकल गरजवंत मराठा समाजाने प्रशासनाकडे निवेदन दिले आहे. गेल्या पाच दिवसांपासून जरांगे पाटील अंतरवाली सराटीत उपोषणास बसले आहेत, ज्यांचे उपोषण सामजिक आणि आरक्षणाच्या मुद्द्यांवर केंद्रित आहे. या उपोषणास



पाठिंबा देण्यासाठी धारूर तालुक्यातील गरजवंत मराठा समाज एकत्रित आला आहे.गरजवंत सकल मराठा समाजाच्या वतीने तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात आले सदर निवेदनात महत्त्वाच्या अनेक मागण्या करण्यात आल्या आहेत. १)महाराष्ट्रातील मराठा समाजास सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणे. २)हैदराबाद व सातारा संस्थान गॅझेटिअरची तात्काळ अंमलबजावणी करणे. ३)न्यायमूर्ती शिंदे समितीने कुणबी नोंदी शोधण्यासाठी समितीला एक वर्ष मुदतवाढ द्यावी. ४) सगे-सोयरे अधिसूचनेचे तात्काळ अंम लबजावणी करण्यात यावी.५) मराठा समाजासाठी एथड आरक्षण रद्द केलेले एथड पुन्हा सुरू करण्यात यावे.६) मराठा समाजावर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे. ७) महाराष्ट्रातील मराठा समाज हा कुणबी आणि मराठा एकच आहे म्हणून महाराष्ट्रातील मराठा सम ाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे यासह अनेक मागण्या करण्यात आल्या आहेत.मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपोषणावर प्रशासनाने तात्काळ विचार न केल्यास, धारूर सकल गरजवंत मराठा समाज शक्तिशाली आंदोलन करण्याची तयारी करत आहे. दि.३१ जानेवारी २०२५ पासून मोर्चे, तहसील कार्यालयासमोरील धरणे आणि इतर संविधानिक पद्धतींचा वापर करून तीव्र आंदोलन सुरू करण्यात येणार आहे, या मराठा आरक्षण आंदोलनात धारूर तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# विद्यार्थ्यांनी स्वतः परिस्थिती बदलली तरच त्यांचे आयुष्य घडू शकते.-प्रा बाळासाहेब सोनसळे

माजलगाव -विद्यार्थ्यांनी मनाशी स्वप्न बाळगले तरच त्यांच्या करियरला दिशा मिळू शकते. आजच्या पिढीने मोबाईलच्या आहारी जाणे थांबवले पाहिजे. अनेक प्रगत राष्ट्रानी यासाठी कायदे केले आहेत. असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते बाळासाहेब सोनसळे यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा समारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.याप्रसंगी मंचावर स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, केंद्रीय सदस्य व संकुलाचे पालक प्रकाश दुगड, महाविद्यालय समितीचे प्रमुख अभय कोकड, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा






अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा परमेश्वर खेत्री यांची उपस्थिती होती.कार्यक्रम ाच्या प्रारंभी म ाता सरस्वती, अहिल्यादेवी होळकर आणि भारतमाता पुजन झाले. यावेळी बोलतांना प्रमुख पाहुणे बाळासाहेब सोनसळे यांनी मघुमान मया कादंबरीच्या संघर्षशील महिलेची कहाणी सांगितली. क्षेत्र कोणतेही असू दया प्रामाणिकपणे कार्य करत राहा असेही ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय प्रा. अंकुश साबळे यांनी केले. विद्यार्थ्यांपैकी कु. कोमल तौर, सायमा बेग, कु प्रिया हरदास, कु प्रतिभा काशीद, चि. नोमान सय्यद, चि. रविराज तोंडे यांनी मनोगतातून महाविद्यालय चा आणि येथील अध्यापन याबद्दल गौरव केला.शिक्षकांच्या वतीने प्रा. राजाराम जाधव व प्रा. परमेश्वर खेत्री यांनी मनोगत व्यक्त केले.संकुलांचे पालक प्रकाश दुगड, स्थानिक पदाधिकारी सुरेंद्र रेदासणी, अभय कोकड, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीस व बोर्ड परीक्षेस शुभेच्छा दिल्या व केवळ मार्कांच्या म ागे धावण्यापेक्षा सुजाण नागरिक बनण्याचाही प्रयत्न करावा असा संदेश दिला या कार्यक्रम ाच्या दरम्यान १२वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भेटवस्तू दिली.म ान्यवरांचे आभार व शांतीमंत्र प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा राघवेंद्र मुळी यांनी केले. कार्यक्रमासाठी बहुसंख्य विदयार्थ्यांची उपस्थिती होती.

# राज्यव्यापी आंदोलनाला न्याय द्यावा-नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी परभणी ते मुंबई लाँगमार्च निघालेला असून गेली ८ दिवस झालं भीम अनुयायी रस्त्याने चालत आहेत. लाँगमार्च समर्थनार्थ ऑल इंडिया पँथर सेना निवेदन देत असून खालील मागण्या तातडीने मान्य करत या राज्यव्यापी आंदोलनाला न्याय द्यावा! १) देशद्रोही सोपान पवार याची नार्को टेस्ट करुन मास्टरमाईंडला अटक करावी. पवारवर देशद्रोह सहित सोमनाथ सूर्यवंशीच्या हत्येला जबाबदार धरून ३०२ अंतर्गत कार्यवाही करा. २) आंदोलक निरपराध भीमसैनिक महिलांवर हल्ला करणारे, सोमनाथ सूर्यवंशीचे हत्याकांड घडवणाऱ्या पोलीसांना तात्काळ मनुष्यवधाच्या गुन्ह्याखाली अटक करुन कायमस्वरूपी बडतर्फ करावे. ३) आंदोलनकर्त्यांवरील खोटे गुन्हे मागे घ्या. ४) बी. आर. आंबेडकर या नावाच्या गाड्या फोडणाऱ्या सीसीटीव्हीमध्ये दिसणाऱ्या पोलिसांवर तात्काळ कार्यवाही करा. ५) परभणी गठीत केलेली न्यायालयीन चौकशी मान्य नसून तात्काळ न्यायधीश बदलवला पाहिजे. ६) पोलिसांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या कार्यकर्त्यांचे रिपोर्ट लपवणाऱ्या आरोग्य अधिकारी व जेलरला तात्काळ निलंबीत करावे. ७) कलम १७६ (-) सीआरपीसी अंतर्गत चौकशी करावी. ८) परभणी पोलीस स्टेशनमधील सीसीटीव्ही जप्त करुन ते तपासावेत. ९) शहीद सोमनाथ सूर्यवंशीच्या पीडित कुटुंबाला रु. २ कोटी तसेच शहीद विजय बाबा वाकोडे यांच्या पीडित कुटुंबाला रु. १ कोटींची मदत करून दोन्ही परिवारातील एका एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी. १०) वच्छालाबाई मानवते या रमाईच्या लेकीला अमानुष मारहाण करणाऱ्या पोलीसांवर ३५४/३०७ अंतर्गत कार्यवाही करावी. या लेकीला रु. १० लाखांची मदत करून तिचे पुनर्वसन करावे. ११) पोलीसांनी कोमिंग मध्ये मारहाण करून जखमी केलेल्या भीमसैनिकांना आर्थिक मदत करावी. १२) शहीद सोमनाथ सूर्यवंशीचे परभणीत स्मारक करावे. १३) संतोष देशमुख यांच्या सर्व आरोपीना अटक करुन आरोपीना फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून फाशी झालीच पाहिजे. अटक आरोपीची नार्को टेस्ट झालीच पाहिजे. कुटुंबाला आर्थिक मदत व शासकीय नोकरी द्यावी. १४) लातूर माऊली सोट च्या मारेकऱ्यांना फाशी झालीच पाहिजे. पीडित कुटुंबाला आर्थिक मदत व भावाला शासकीय नोकरी द्यावी

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड, दि. २९ :- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा बीड जिल्हा दौरा पुढीलप्रम ाणे आहे.गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.१० वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथे आगमन. सकाळी ७.१५ वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. सकाळी ७.५५ वाजता पोलीस परेड ग्राऊंड येथील हेलीपॅड पोलीस मुख्यालय, बीड येथे आगमन सकाळी ८.०० वाजता मोटारीने जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आगमन. सकाळी ८.०० वाजता बीड जिल्हयातील सर्व शासकीय विभाग प्रमुखांची बैठक (जिल्हाधि-कारी,बीड पोलीस अधिक्षक बीड व सर्व संबधित अधिकारी). स्थळ नियोजन सभागृहसकाळी १०.०० वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी १२.१५ ते १.०० वाजेपर्यंत राखीव. १.१५ वाजता मोटारीने राष्ट्रवादी भवन कार्यालय मित्र नगर येथे आगमन व राष्ट्रवादी भवन जिल्हा कार्यालयास सदिच्छा भेट.दुपारी १.५५ वाजता पोलीस परेड ग्राऊंड येथील हेलीपॅड, पोलीस मुख्यालय बीड येथे आगमन. दुपारी २.०० वाजता हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजीनगर विमानतळाकडे प्रयाण

*****

# उरण पाठोपाठ नांदेड जिल्ह्यातही बर्ड फ्लूचा शिरकाव, मृत कोंबड्यांचा अहवाल पॉझिटिव्ह, दहा किमी परिसरात हाय अलर्ट

नागपूर येथे वाघांना बर्ड फ्लू झाल्यानंतर रायगड जिल्ह्यातील उरण येथील चिरनेर येथे कोंबड्यांना बर्ड फ्लूचा झाल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर आता नांदेड जिल्ह्यात देखील बर्ड फ्लूचा शिरकाव झाला आहे. कारण नांदेडच्या किवळा येथील कोंबड्यांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. यामुळे अनेक कोंबड्या आणि त्यांची अंडी नष्ट करण्यात आली आहेत.पशू संवर्धन विभागाने या संदर्भात संरक्षणात्मक उपाययोजना सूरू केल्या आहेत. अद्याप या बर्ड फ्ल्यूचा मानवाला संसर्ग झाला नसल्याने बर्ड फ्लू रोगाबाबत अनावश्यक भीती बाळगू नये तसेच अफवा आणि गैरसमज पसरवू येऊ नये असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



रायगड जिल्ह्यातील उरणच्या चिरनेर येथे कोंबड्यांना बर्ड फ्लूची लागण झाल्यानंतर या कोंबड्यांचा अहवाल पॉझिटीव्ह आल्याने एक किलोमीटर परिसरातील कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्यात आली होती. चिरनेर येथील पॉल्ट्री फॉर्मच्या कोंबड्या मृत झाल्यानंतर प्रशासनाने एक किलोमीटर परिसरातील १,२३७ कोंबड्या आणि अंडी नष्ट केली होती. तर दहा किलोमीटर परिसरातील कोंबड्यांचे सर्वेक्षण सुरु करण्यात आले होते. कोंबड्यांचे मांस खाताने नीट शिजवून खाण्याचे आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले आहे.किवळा येथील परिसर अलर्ट झोन नांदेड जिल्हयात बर्ड फ्ल्यूचा शिरकाव झाला आहे.नांदेडच्या लोहा तालुक्यातील किवळा येथे मृत कुकुट पक्षांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे . त्यामूळे पशू संवर्धन विभागाकडून तातडीने उपाययोजना सूरू केल्या आहेत. कीवळा येथील शेतकरी पंजाब टरके यांच्या मोकळ्या कुकुट पालन केंद्रातील कोंबड्यांची २० पिल्ले मृतावस्थेत आढळले होती. पशुसंवर्धन विभागाने या मृत कुकुट पक्षांचे नमुने पुणे आणि भोपाळ येथील प्रयोगशाळेत पाठवले होते. त्याचा अहवाल आज प्राप्त झाला असून हे नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. मृत कुकुट पक्षांना बर्ड फ्लूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे किवळा येथील दहा किलोमीटर परिसर अलर्ट झोन घोषित करण्यात आला आहे.

# बुलढाणा: शेगांवातील लोकांच्या टकलावर केस उगवायला सुरुवात, पण आता एक नवीन समस्या सुरु..



बुलढाणा येथील शेगांव गावातील अनेक लोकांना अचानक केसगळती सुरु झाल्याच्या बातम्यांनी देशभर टक्कल व्हायरसची चर्चा सुरु झाली होती. या अचानक सुरु झालेल्या केसगळती मागचे कारण अद्याप कोणालाही समजले नाही. या गावातील लोकांना पुरविण्यात येणा-या पाण्याचे नमूने तपासण्यात आले. तरुणांचे किंवा म्हाता-यांचे सर्वांचे केस गळू लागल्याने या गावातील लोकांची समस्या राष्ट्रीय समस्या ठरली.या लोकांना फंगल इन्फेक्शन देखील झालेले नाही असा दावा डॉक्टरांनी केला. आयसीएम आरच्या पथकाने गावात येऊन तपासणी केली आहे. आयसीएमआरचा अहवाल काही आलेला नाही. परंतू या गावातील लोकांच्या डोक्यावर आता एका औषधाने केस उगवले आहेत. परंतू आता त्यांना नवीन समस्या सुरु झाली आहे.बुलढाणा येथील बोंडगाव, कालवड, हिंगणा अशा ११ गावात अक्षरशः टक्कल व्हायरस पसरलाआहे असा दावा केला जात आहे. या आजाराला गावातील पाणी जबाबदार असल्याचे म्हटले जात होते. गावातील पाण्याचे अनेक नमूने तपासणीसाठी नेण्यात आले आहेत. परंतू पाण्यात फारसा काही दोष आढळला नसल्याचे म्हटले जात आहे. काही गावातील पाण्यात क्षार जास्त असले तरी इतर अनेक गावात असे पाणी आहे परंतू तेथील लोकांचे असे केस गळत नाहीत असाही दावा केला आहे. लोकांना आधी डोक्यात खाज येते, त्यानंतर खाजवण्यास गेले असता थेट केसच हातात येतात. त्यामुळे गावातील तरुणांच्या लग्नाचे देखील वांदे झाले आहेत. या गावातील तरुणांना कोणी मुलगी तयार होत नसल्याचे देखील उघडकीस आले आहे.

## आता नवीनच समस्या सुरु

केसगळतीने हैराण झालेल्या गावक-यांना आता आयुर्वेदामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. येथील डोक्यवार केस उगवलेल्या नागरिकांना टक्कल पडण्यापासून दिलासा मिळत आहे. भारतीय आयुर्वेद अनु-संधान संस्थानने असा दावा केला आहे. आयुर्वेदाच्या औषधाने टक्कल पडलेल्यांना केस यायला सुरुवात झाली आहे. मात्र केस आल्यावर केस पुन्हा जात असल्याचे नागरिक म्हणत आहेत. आता तर आता नवीनच समस्या निर्माण झाली आहे. ज्यांना टक्कल पडले होते. त्यांना आता डोळ्यांचा त्रास सुरू झाला आहे. तर काहींची नजर कमजोर होत असल्याचा आरोप होत आहे. या समस्येवर तात्काळ निदान शोधण्याची मागणी गावक-यांनी केली आहे.

बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार ३० जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## दिनेश वाघमारे यांनी स्वीकारला राज्य निवडणूक आयुक्तपदाचा पदभार

मुंबईः राज्याचे माजी अपर मुख्य सचिव दिनेश वाघमारे यांनी आज राज्य निवडणूक आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी त्यांचे स्वागत केले. राज्यपाल महोदयांनी श्री. वाघमारे यांची पाच वर्षांसाठी राज्य निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. त्यासंदर्भातील अधिसूचना २० जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झाली होती. त्यानुसार त्यांनी आज राज्याचे सातवे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. श्री. वाघमारे यांनी इलेक्ट्रॉनिक अभियांत्रिकीमध्ये बीटेक (१९८७) केले आहे. आयआयटी खरगपूरमधून त्यांनी संगणकशास्त्रात एमटेक (१९८९); तर यूकेमधून ङ्गविकास व प्रकल्प नियोजनफ या विषयात एमएस्सी (२००७) केले आहे. १९९४ च्या तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असलेले श्री. वाघमारे यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे. रत्नागिरीचे सहायक जिल्हाधिकारी म्हणून श्री. वाघमारे यांच्या प्रशासकीय कारकीर्दीला सुरुवात झाली होती. वाशीम आणि यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारीपदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर त्यांनी बुलढाण्याचे जिल्हाधिकारीपद भूषविले होते. ते नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्षही होते. विविध शासकीय महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, सदस्य सचिव; तसेच नवी मुंबई व पिंपरी- चिंचवड महानरपालिकेचे आयुक्त म्हणूनही ते कार्यरत होते. अमरावतीचे विभागीय आयुक्त म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. वैद्यकीय शिक्षण विभागासह सामाजिक न्याय, ऊर्जा, गृह इत्यादी विभागांतही त्यांनी विविध पदे भूषविली आहेत. श्री. वाघमारे यांना स्कॉच अवॉर्ड, नवभारत गव्हर्नन्स अवॉर्ड, सीएसआर इंडिया २०२१ अवॉर्ड, पीएसयू अवॉर्ड फॉर डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, ग्रीनटेक लीडिंग डायरेक्टर अवॉर्ड २०२१, सत्यन मित्रा नॅशनल अवॉर्ड इत्यादी पुरस्कारांनी वेळोवेळी गौरविण्यात आले आहे

# शेतकऱ्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याची धमकी

बीड । प्रतिनिधी बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरुच असुन शेतकऱ्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याच्या धमक्या पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांकडुन घडला असुन पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांची बैठक घेऊन त्यांना संरक्षण देण्याची हमी दिली. कंपन्यांकडुन खंडणीखोरांवर कठोर कारवाई व्हायलाच हवी मात्र पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याची भाषा करत असेल तर मग शेतकऱ्यांचे संरक्षण कोणी करायचे? मग पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांची बैठक घेतली तर पिडीत शेतकऱ्यांची बैठक कधी घेणार?शेतकऱ्यांना वाली कोण ? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांना केला आहे. बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकऱ्यांची अहमदपूर ते अहिल्यानगर राज्य महामार्गावर शेतजमीन असुन २ वर्षांपासून रेन्य पावर कंपनीने गोडाऊन साठी भाडेतत्त्वावर घेतली होती. शेतकऱ्यांना एकरी ३० हजार रूपये प्रतिवर्ष भाडेतत्त्वावर शेतजमीन घेतली. त्यांना वार्षिक भाडेही दिले मात्र जाताना जमिन पुर्ववत करून देण्याचे बांधबंदिस्ती, खडकाळ जमिनीत गाळ टाकुन देण्याचे



आश्वासन मात्र साफ विसरून गेले आज दि.२७ कंपनीच्या गाड्या जागा खाली करत असताना शेतकऱ्यांनी गाड्या अडवून विचारणा केली असता त्यांना गाड्या सोडुन द्या अडवु नका अन्यथा पोलिस केस करून तुरुंगात टाकु अशी धमकी दिल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.आता त्यांनी आमच्यावर गुन्हे दाखल करूनच पहावेत असे महादेव सदाशिव कदम, बाबासाहेब कदम,संजय घरत,विष्णु घरत यांनी म्हटले आहे. पवनचक्की कंपन्यांना आम्ही अगोदर जागा देत नव्हतोच.तेव्हा विनवनी केल्यानंतर तयार झालो. परंतु दंड मोडला,चिरे काढले तवाच आम्ही म्हणलं आमच्या रानाचं वाटुळं व्हाय लागलंय आम्हाला शेतजमीन नाही द्यायची.तेव्हा म्हणले आम्ही जाताना वाहनांच्या वावरामुळे खडकाळ होणा-या जमिनीत तलावातील गाळ टाकु, तसेच पहिल्या सारखं दंड आणि बांधबंदिस्ती करून देऊ पण आज सगळ्या गाड्या सामान घेऊन चालल्या आम्ही आधिका-यांना विचारले असता अगोदर म्हणले ४-८ दिवसांनी येऊन करून देऊ.नंतर तर म्हणले गाड्या सोडुन द्या नाहीतर पोलिस केस करून तुरुंगात टाकु. मग आम्ही म्हणलो आता पोलिस केस करूनच दाखव बघु काय होईल ते अशी संतप्त प्रतिक्रिया महादेव सदाशिव कदम यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली. पोलिस अधिक्षक नवनीत कांवत यांनी २ जानेवारी रोजी बीड जिल्ह्यात पवनचक्की उभारताना त्रास होऊ नये म्हणून सौर व पवन ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची बैठक घेतली. आणि दलाल खंडणीखोरांना घाबरू नका ,गावगुंड खंडणी मागत असतील तर जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार करा. स्थानिक पोलिसांचे नंबर ठेवून त्यांना माहिती द्या आणि संकट समय ११२ नंबरला फोन करा अशा प्रकारच्या विविध सूचना दिल्या परंतु हे पवनचक्की कंपनी वाले धुतल्या तांदळासारखे अजिबात नाहीत. त्यांनी बीड जिल्ह्यातील कायदा अनुसूव्यवस्था बाधित केले आहे त्यांचे रक्षण करणे हे पोलिसांची जबाबदारी आहे त्याचबरोबर इथल्या शेतकऱ्यांना संरक्षण देणे. पवनचक्की कंपन्यांकडून त्रास होत असेल तर त्यांचे संरक्षण करणे हि सुद्धा त्यांची जबाबदारी आहे.त्यामुळे पिडीत शेतकऱ्यांची बैठक पोलिस अधीक्षक साहेब कधी घेणार असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी विचारला आहे.


## केज पंचायत समिती मैदानात ह. भ. प. केशव महाराज शास्त्री यांच्या अमृतवाणीतून भागवत कथेचे आयोजन

केज/प्रतिनिधी :-केज पंचायत समिती मैदानात ह. भ.प.केशव महाराज शास्त्री यांच्या अमृतवाणीतून भागवत कथेस प्रारंभ होऊन आज दुस-या दिवशी भाविकांनी कथा श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती या कथेमध्ये हे.भ.प.केशव महाराज शास्त्री यांनी भाविकांना समजेल अशा भाषेत भागवत कथेचे कथन करून भाविकांना मंत्रमुग्ध केले होते यावेळी महाराजांनी भागवत



कथा व्यास यांनी गणपती बाप्पाच्या हातून लिहून घेतले परंतु हे ज्ञान कोणाला द्यायचे हा मोठा प्रश्न व्यासा पुढे होता यावर मार्ग काढून भगवतगीतेचे कथा सांगत असताना महाराजांनी आवर्जून काही लोकांना आई-वडिलांपेक्षा कुत्रे पाळण्यात जास्त रस असतो यातून एकच संदेश देण्यात आला की, आपण आपल्या आई-वडिलांना व्यवस्थित सांभाळा व प्राणीमात्रावरही दया करा परंतु आधी माता पिता नंतर सर्व काही असा संदेश ह.भ.प.केशव.भ.प. केशव महाराज शास्त्री यांनी आपल्या अमृतवाणीतून जनतेच्या मनावर रुजेल अशा भाषेत सांगण्याचा प्रयत्न केला यावेळी जमलेल्या भाविकांनी या कथेचे श्रवण करून आत्मसात करावे हीच अपेक्षा व्यक्त करण्यात आली.यावेळी पंचायत समिती मैदानात मोठ्या संख्येने भागवत कथा श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने महिला व लहान थोर मंडळी उपस्थित होती.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान येथे अखंड हरिनाम सप्ताह



गेवराई : भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान कुंभेजळगाव ,(ता. गेवराई) येथे भगवान कुंभेश्वर व भगवान गोरक्षनाथ महाराज यांच्या कृपेने वै.ब्रम्हनिष्ठ गुरुवर्य महंत वामन महाराज गिरी यांच्या पुण्यतिथीनिमीत्त ह.भ.प महंत दत्ता महाराज गिरी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि.२९ जानेवारी पासून ५३ वा अखंड हरिनाम सप्ताह व रामकथा प्रवक्ते जनार्दनजी महाराज अरावेकर यांच्या संगीत तुळशी रामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील भाविकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत ह.भ.प. दत्तात्रय महाराज गिरी यांनी केले आहे. या सप्ताहात गाथा भजन नेतृत्व सुदाम म. गवारे, अभिमन्यु म. गिरी, रामेश्वर म.चव्हाण, शिवाजी म.भोसले, श्रीराम म. पांगरे, पांडुरंग म.जाधव यांचे आहे. तसेच महाराष्ट्रातील ख्यातनाम किर्तनकारांची किर्तनसेवा होणार आहे. यामध्ये बुधवार दि.२९ जानेवारी रोजी दिनेश महाराज माने , गुरुवार दि.३० रोजी भरत महाराज जोगी , शुक्रवार दि.३१ रोजी चंद्रकांत महाराज खळेकर , शनिवार दि.०१ फेब्रुवारी जनार्दन महाराज आरावेकर , रविवार दि.२ रोजी ज्ञानेश्वर महाराज जळकेकर , सोमवार दि.३ रोजी माऊली महाराज खडकवाडीकर, मंगळवार दि.४ रोजी महादेव महाराज राऊत ,तर बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत गुरुवर्य ह.भ.प.श्री दत्तात्रय महाराज गिरी यांचे दुपारी १ ते ३ या वेळेत अमृततुल्य काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे.

## जालन्यात महिला रस्त्यावर उतरल्या, वडीगोद्री गावात मराठा आंदोलक आक्रमक,

जालन्यात मराठा समाजाच्या महिला आंदोलक आक्रमक झाल्या आहेत. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज पाचवा दिवस आहे. पण तरीदेखील राज्य सरकारकडून त्यांच्या आंदोलनाची दखल घेतली न गेल्यामुळे महिला आंदोलकांनी वडीगोद्री गावात धुळे-सोलापूर महामार्ग अडवला.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची सुनावणी पुन्हा लांबणीवरपुढील सुनावणी २५ फेब्रुवारी रोजी

वृत्तसंस्था:-राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत मंगळवारी ठेवण्यात आलेली सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे.सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने निवडणुक आयोग आणि राज्य सरकारच्या अधिका-यांकडून निवडणुकी विषयी माहिती जाणून घेतल्यानंतर येत्या २५ फेब्रुवारी रोजी त्यावर सुनावणी घेण्यात येईल असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे.२५ फ ेब्रुवारी रोजी होणा-या सुनावणीत न्यायालयाने अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात असून मे म हिन्यात प्रत्यक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडतील असे देखील बोलले जात आहे.

## अजित दादांना एकच निवेदन बीडची बारामती करा ! - नितीन जायभाये





बीरड । प्रतिनिधी फार मोठ्या वेगळ्या परिस्थितीत आणि वेगळ्याच योगायोगाने बीड जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्थापन बहाल करण्यासाठी माननीय अजितदादा आपल्याकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद आलेले आहे. आपल्याकडून बीडकरांच्या अपेक्षा फार उंचावलेल्या आहेत. दादा,आपल्या कार्यशैलीचा व विकासाभिमुख नेतृत्वाचा परिचय बीडकरांना व संपूर्ण महाराष्ट्राला आहे. उद्या आपण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून प्रथमच प्रशासकीय दौऱ्यावर येत आहात. सर्व जिल्ह्याचे व महाराष्ट्राचे लक्ष आपल्या दौऱ्याकडे लागलेले आहे. दादा आपण व सुनेत्रा वहिनींनी काटेवाडी व बारामती परिसराचा गेल्या काही वर्षातच कायापालट करून दाखवून अफ श्रेणी प्रशासन निर्माण करण्याचा व विकासाचा कार्यक्रम राबवला आहे. याबद्दल सर्व महाराष्ट्राला माहिती आहे. काटेवाडी गावातही आपण लोकांची सर्व कामे एकाच इमारतीतून व्हावी त्यासाठी ग्रामसचिवालय व मिनी मंत्रालय तेथे उभा केले. अफ वर्ग श्रेणीचे आरोग्य केंद्र,आरोग्य व्यवस्था व गतिमान प्रशासन आपण तेथे निर्माण केले आहे. सरासरी दुष्काळग्रस्त भागाप्रमाणेच पाऊस पडत असताना सुद्धा जलसिंचनाच्या अनेक योजना राबवून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारा समृद्ध बागायतदार शेतकरी वर्ग फार अल्पावधीतच आपण निर्माण केला आहे. दादा, तुमच्या प्रयत्नाने कुशल प्रशासनाने काटेवाडी व बारामती परिसरामध्ये समृद्ध भांडवलदार बागातदार शेतकरी वर्ग निर्माण झाला आहे. दादा, आपण कुशल प्रशासक व विकासाभिमुख दृष्टिकोन असलेले नेतृत्व

## संत निरंकारी समागमाची सांगता... सदगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी दिला जीवनाचा मूलमंत्र






पुणे प्रतिनिधीनिरंकारी संत समागम डेअरी फार्म मिलिटरी ४५० एकर मैदानात पार पडलेल्या या सोहळ्याला देश-विदेशातून लाखो भाविकांनी उपस्थिती लावली होती. पिंपरी : जीवनाचा उद्देश केवळ भौतिक प्रगतीमध्ये नसून, आत्मिक उन्नतीमध्ये आहे,ङ्ग असे मत निरंकारी सदगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी व्यक्त केले. महाराष्ट्राच्या ५८ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या समारोपाच्या दिवशी (रविवारी) भाविकांना त्यांनी जीवनाचा मूलमंत्र दिला. डेअरी फार्म मिलिटरी ४५० एकर मैदानात पार पडलेल्या या सोहळ्याला देश-विदेशातून लाखो भाविकांनी उपस्थिती लावली होती.परमात्मा निराकार असून, या परमसत्याला जाणणे हेच मनुष्य जन्माचे परम लक्ष्य आहे. जीवन एक वरदान असून, ते परमात्म्याशी क्षणोक्षणी संलग्न राहून जगायला हवे. क्षणोक्षणी जीवन योग्य दिशेने व्यतीत केल्याने आपल्याला आत्मिक शांती मिळू शकते,ङ्ग असे सुदीक्षाजी महाराज यांनी सांगितले.

ङ्गभक्ती करण्याचा हेतू हा परमात्म्याशी प्रेम जोडण्याचा असावा. संत आपल्या आत्म्याचे मूळ स्वरूप जाणून जीवनाला योग्य दिशेला घेऊन जाण्याची शिकवण देतात. आपण आपली आस्था आणि श्रद्धेला सत्याकडे वळविले पाहिजे. तेव्हाच परमात्म्याच्या प्रति प्रेम उत्पन्न होईल व ख-्या अर्थाने भक्तीचा विस्तार सार्थक ठरेल,ङ्ग असे निरंकारी राजपिता रमितजी यांनी सांगितले.मागमाच्या तिस-्या दिवशी बहुभाषिक कवी दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. मविस्तार - असीम की औरफ ही संकल्पना घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या कवी दरबारात देशाच्या विविध भागातून आलेल्या २१ कवींनी मराठी, हिंदी, इंग्रजी, कोकणी, भोजपुरी या भाषांम धून कविता सादर केल्या. श्रोत्यांनी या कवी दरबाराचा मनमुराद आनंद लुटला. याशिवाय समागम सोहळ्यादरम्यान बालकवी दरबार व महिला कवी दरबाराचे आयोजन केले गेले. या दरबारांमध्ये विविध भाषांच्या माध्यमातून बाल कवी आणि महिला कवयित्रींनी काव्य पाठ केला.निःशुल्क उपचा समागम स्थळावर ६० खाटांचे रुग्णालय तयार करण्यात आले होते. ज्यामध्ये आपत्कालीन परिस्थितीत मआयसीयूफची सुविधाही उपलब्ध होती. या व्यतिरिक्त तीन ठिकाणी निःशुल्क उपचारांची व्यवस्था करण्यात आली होती. या ठिकाणी ११ रुग्णवाहिका तैनात होत्या. स्वास्थ्य सेवेमध्ये २८२ डॉक्टर तसेच जवळपास ४५० सेवादल स्वयंसेवकांनी आपली सेवा दिली.तसेच काईरोप्रॅक्टिक थेरपीद्वारे उपचार करण्याचे निःशुल्क शिबिर या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. यामध्ये १८ डॉक्टरांच्या टीमने ३५०० नागरिकांवर मोफत उपचार केले. या शिवाय समागमाचे तीनही दिवस या ठिकाणी निःशुल्क भोजन सेवा म्हणजेच लंगर ठेवण्यात आले होते. सदगुरू प्रवचनाव्यतिरिक्त २४ तास लंगर सेवा सुरू होती. लाखो भाविकांनी यावेळी प्रसादाचा लाभ घेतला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com